# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 10/04/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## मौजा चाकडोह येथील दारू अड्डयावर धाड
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई :—

दिनांक १०/०४/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक काटोल उपविभागात गस्त करीत असतांना पोलीस स्टेशन कोंढाळी हद्दीतील मौजा चाकडोह येथे जयेंद्र मनोहर कौरती नावाचा इसम हा त्याचे घरासमोर अवैधरित्या बिनापरवाना देशी दारू बाळगुन विक्री करीत असल्याची गोपनिय माहीती पथकास प्राप्त झाले वरून सदर पथकाने सापळा रचुन छापा टाकला असता **आरोपी नामे— जयेंद्र मनोहर कौरती, वय ५० वर्ष, रा. शेखापुर ता. काटोल जि. नागपूर** याचे ताब्यात १८० एम.एल च्या एकुण ४८ नग देशी दारूच्या निपा, एकुण किंमती ३३६०/—रूपयाचा मुद्देमाल अवैधरित्या बिनापरवाना मिळुन आल्याने सदर मुद्देमाल त्याचे ताब्यातुन जप्त करून आरोपी विरूध्द अप. क्र. १७०/२०२३ कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपीस जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे कोंढाळी यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस ठाणे कोंढाळी करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक फौजदार चंद्रशेखर घडेकर, पोलीस हवालदार निलेश बर्वे, दिनेश अधापुरे, महिला पोलीस नाइक स्वाती हिंडोरीया, पोलीस शिपाई आशुतोष लांजेवार यांचे पथकाने केली.



## दुखापत

**पो.स्टे. भिवापुर :–** अंतर्गत ०५ किमी अंतरावर नक्षी येथे दिनांक ०९/०४/२०२३ चे १०.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुनिल देवराव वऱ्हाडे, वय ४९ वर्षे, रा. नक्षी ता. भिवापूर ह. मु. दर्शन कॉलनी प्लॅाट नं. ४०२ डी व्यंकटेश नगर याची नक्षी शिवारात शेती असुन त्यातील साडे तीन एकर कॅनलचे बाजुची शेती श्रावण वाघमारे यांना सन २०२० मध्ये विकली त्याची १ प्रत त्याना दिली दि. ०९/०४/२०२३ रोजी फिर्यादी हा शेतात हजर असता श्रावण वाघमारे हा आला व पाधंण रस्ता २६ फुट सोडून फिर्यादीला शेती मोजुन दे असे म्हणुन फिर्यादीला शिविगाळ करून लाकडी दंडयाने मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीच्या पायाला जखम झाली आरोपी याने जिवे मारण्याची धमकी दिली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार माहुरे ७७४१९४१२०१ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. अरोली :–** अंतर्गत १४ कि.मी. अंतरावरील मौजा विरशी ता. मौदा येथे दिनांक ०७/०४/२०२३ चे १६/०० वा. दरम्यान यातील **मृतक नामे – नंदकिशोर धोटे, वय ४१ वर्षे, रा. विरशी ता. मौदा जि. नागपुर** हा त्याचे घराचे बाजुलाच असलेल्या गीताबाई महादुले यांच्या शेतात असलेल्या ट्रॅक्टरचे ट्रॉलीमध्ये धानाची तनस ठेवत होते तेव्हा अचानक आभाळ भरुन आले व विजांचा कडकडाट होवुन आकाशातील विज मृतक नंदकिशोर याचेवर कोसळली तो बेशुदध पडला विजेच्या आवाजाने गावातील लोकांनी वाहनाने सरकारी दवाखाना कामठी येथे उपचारा करिता दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कृष्णा गोविंद धोटे वय ४१ वर्षे, रा. विरशी ता. मौदा जि. नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोना श्याम पोकळे ब. नं. १९७६ पोस्टे अरोली हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**